**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)**
**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**
**(०२३५८) २८२३८७**

**अंक ४२/२०२०** **दिनांक २६/०५/२०२०** **कालावधी ५ दिवस**

| | | |
|---|---|---|
| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |

| **मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २०/०५/२०२० ते २६/०५/२०२०)** | | | | | | | **हवामानाचे घटक** | **हवामान पूर्वानुमान (दिनांक २७/०५/२०१९ सकाळी ८:३० पासून ३१/०५/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत)** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **२०/०५** | **२१/०५** | **२२/०५** | **२३/०५** | **२४/०५** | **२५/०५** | **२६/०५** | | **२७/०५** | **२८/०५** | **२९/०५** | **३०/०५** | **३१/०५** |
| ० | - | - | - | - | - | - | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | १२ |
| ३६.२ | - | - | - | - | - | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३७ | ३६ | ३६ | ३६ | ३८ |
| २२.८ | - | - | - | - | - | - | **किमान तापमान (अं.से)** | २५ | २५ | २५ | २५ | २६ |
| ० | - | - | - | - | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | २ | २ | २ | १ | १ |
| ५२ | - | - | - | - | - | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ८७ | ८८ | ८८ | ८८ | ९१ |
| ४७ | - | - | - | - | - | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ३७ | ३६ | ४५ | ४३ | ४३ |
| ३.७ | - | - | - | - | - | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ४ | ७ | ८ | ६ | ३ |
| आ. | - | - | - | - | - | - | **वाऱ्याची दिशा** | नै. | नै.द. | नै.द. | द. | नै. |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक ३१ मे २०२० रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून कमाल व किमान तापमानात वाढ संभवते तसेच आकाश निरभ्र राहील.**

| **पिक** | **अवस्था** | **कृषि सल्ला** |
|---|---|---|
| **कोविड-१९ बाबत शेतकऱ्यांनी घ्यावयाची दक्षता** | | • कोरोना विषाणूचा संसर्ग प्रतिबंधित करण्यासाठी शेतीतील कामे करताना, शेतीसाठी आवश्यक खरेदी आणि विक्री करताना स्वच्छता व सुरक्षिततेच्या खबरदारीच्या उपाययोजनांचे पालन करावे. |
| **खरीप भात** | **रोपवाटिका पूर्वतयारी** | • भात रोपवाटीका तयार करावयाच्या क्षेत्रामध्ये जमीन नांगरून ढेकळे फोडावीत. प्रती गुंठा क्षेत्रास १०० किलो शेणखत जमिनीत मिसळावे. जमिनीचा उतार लक्षात घेऊन, उंच निचऱ्याच्या जागी तळाशी १२० सें.मी. व पृष्ठभागी ९० सें.मी. रुंदीचे, ८ ते १० सें. मी. उंचीचे उतारानुसार योग्य त्या लांबीचे गादीवाफे तयार करावेत. एक एकर क्षेत्रावरील पुर्नलागवडीसाठी रोपवाटिका चार गुंठे क्षेत्रावर तयार करावी.<br>• जाड दाण्याच्या जातीसाठी एकरी २० ते २४ कि.ग्रॅ., बारीक व अतिशय बारीक दाण्याच्या जातीसाठी एकरी १४ ते १६ कि.ग्रॅ. आणि संकरीत जातीसाठी एकरी ८ कि.ग्रॅ. बियाणे वापरावे. भाताची लागवड रहू पध्दतीने करावयाची असल्यास बारीक दाण्यांच्या जातीसाठी ३२ किलो आणि जाड दाण्यांच्या जातीसाठी ४० किलो बियाणे प्रति एकरी वापरावे. |
| **नागली** | **रोपवाटीका पूर्वतयारी** | • नागली रोपवाटीकेसाठी पाण्याचा निचरा होणाऱ्या जमिनीची निवड करावी. निवडलेल्या क्षेत्रावर नांगरणी करून जमीन तयार करावी. जमिनीत प्रती गुंठा क्षेत्रास २५० किलो कुजलेले शेणखत मिसळावे. जमिनीचा उतार लक्षात घेऊन, उंच निचऱ्याच्या जागी तळाशी १२० सें.मी. व पृष्ठभागी ९० सें.मी. रुंदीचे, ८ ते १० सें. मी. उंचीचे उतारानुसार योग्य त्या लांबीचे गादीवाफे तयार करावेत.<br>• एक एकर क्षेत्रावर लागवड करण्यासाठी २ ते २.५ कि.ग्रॅ बियाणे वापरावे. एक एकर क्षेत्रावर लागवड करण्यासाठी रोपवाटिका ४ गुंठे क्षेत्रावर तयार करावी.<br>• डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठाने दापोली नं. १, दापोली सफेद १ (कोंकण सफेद १) आणि दापोली नं. २ या नागलीच्या जाती कोंकण विभागात खरीप लागवडीसाठी शिफारसीत केल्या आहेत. |
| **आंबा** | **फळधारणा** | • तयार असलेल्या सर्व आंबा फळांची काढणी चौदा आणे (८० ते ८५ टक्के) पक्वतेला देठासह सकाळी १० वाजेपर्यंत किंवा संध्याकाळी ४ नंतर करावी. उष्णतेमुळे फळांचे तापमान वाढून साक्याचे प्रमाण वाढण्याची शक्यता असल्याने आंब्याची फळे काढल्यानंतर लगेचच सावलीमध्ये ठेवावीत तसेच आंबा फळांची वाहतूक रात्रीच्या वेळेस करावी. फळे काढणीच्या किमान १५ दिवस अगोदर झाडावर कोणतीही फवारणी करू नये.<br>• फळकूज ह्या काढणी पश्चात बुरशीजन्य रोगापासून आंबा फळांचे संरक्षण करण्यासाठी काढणी नंतर लगेचच फळे ५२ अं.सें. तापमानाच्या पाण्यात १० मिनिटे बुडवून काढावीत व नंतर फळे पिकविण्यासाठी ठेवावीत.<br>• आंबा बागेत फळमाशी तसेच फळे पोखरणारी अळी इ. किडीच्या प्रादुर्भावामुळे गळलेली फळे वेळोवेळी गोळा करून नष्ट करावीत व बागेत स्वच्छता ठेवावी.<br>• आंबे काढून झाल्यावर बांडगुळे व वाळलेल्या फांद्या काढून झाडे स्वच्छ करावीत. बांडगुळे मोठी असल्यास फांद्यासह कापून काढावीत आणि कापलेल्या भागांवर बोर्डोपेस्ट किंवा डांबर लावावे.<br>• बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **नारळ** | - | • नवीन लागवड केलेल्या नारळ बागेमध्ये पावसाळ्यात लहान रोपांना कोंब कुजणे या बुरशीजन्यरोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. या रोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी झाडाच्या कोंबानजीकच्या गाभ्यावर पावसाळ्यापूर्वी करावी. |

| | | |
|---|---|---|
| | | • तापमानात वाढ व आर्द्रतेत घट संभवत असल्याने नारळ बागेस ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **कोकम** | **पूर्व तयारी** | • कोकम नवीन लागवड करण्यासाठी पाण्याचा उत्तम निचरा असलेली जमीन निवडावी. लागवडीसाठी निवडलेल्या क्षेत्रातील साफ सफाई करून घ्यावी. ६ **x** ६ मीटर अंतरावर ६० **x** ६० **x** ६० सें.मी. आकाराचे खड्डे खणून ते चांगली माती आणि १० किलो **चांगले कुजलेले शेणखत** आणि १ किलो सिंगल सुपर फॉस्फेट या मिश्रणाने भरून तयार ठेवावेत.<br>• डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठाने कोकण हातीस आणि कोकण अमृता या कलम पध्दतीने विकसित केलेल्या जातीची कोकणामध्ये लागवडीसाठी शिफारसीत केल्या आहेत. |
| **आवळा** | **पूर्व तयारी** | • आवळा हे काटक फळझाड असून वरकस किंवा क्षारपड जमिनीतही चेता येते. आवळ्याची नवीन लागवड करण्यासाठी पाण्याचा निचरा होणारी जमीन निवडावी. लागवडीसाठी निवडलेल्या क्षेत्रातील साफ सफाई करून घ्यावी. ७ **x** ७ मीटर किंवा १० **x** १० मीटर अंतरावर १ **x** १ **x** १ मी. आकाराचे खड्डे खणून ते चांगली माती आणि २० ते ३० किलो **चांगले कुजलेले शेणखत** आणि १.५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट या मिश्रणाने भरून तयार ठेवावेत.<br>• डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठाने कोकण विभागात कृष्णा, कांचन, एन. ए.- ७, एन. ए.-१० आणि चकय्या या सुधारित जातींची लागवडीसाठी शिफारसीत केल्या आहेत. |
| **चिकू** | **-** | • चिकू फळांची पावसाळ्यात बुरशीजन्य रोगामुळे होणारी फळगळ नियंत्रणासाठी सुकलेल्या व रोगट फांद्या कापून त्याजागी १ टक्का बोर्डोपेस्ट लावावी व पावसाळ्याच्या अगोदर १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी. पुढील दोन फवारण्या १५ ते २० दिवसांच्या अंतराने कराव्यात.<br>• बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने**,** नवीन लागवड केलेल्या चिकू बागेत ४ ते ५ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• चिकू पिकामध्ये फुलकळी पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के एस. जी. ४.५ ग्रॅम किंवा डेल्टामेथ्रीन २.८ टक्के प्रवाही १० मि. ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही १० मि. ली. किंवा प्रोफेनोफोस ४० टक्के प्रवाही १० मि. ली. प्रती १० लिटर पाण्यात या पैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी करावी. तसेच किडीच्या सर्वेक्षणासाठी निळ्या रंगाच्या प्रकाशसापळा बागेत बसवावा. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या** | **-** | • तापमानात वाढ संभवत असल्याने गाभण म्हशींना पाण्याने रोज धुवावे. दिवसातून तीन वेळा स्वच्छ आणि थंड पाणी पाजावे.<br>• गाभण गाई आणि म्हशींना २.५  किलो आंबोण (खुराख), ५ ते ७ किलो वाळलेली वैरण, १५ ते २० किलो हिरवी वैरण प्रति दिन द्यावे तसेच दुभत्या जनावरांना १ ते १.५ किलो आंबोण (खुराख)**,** १५ ते २० किलो हिरवी वैरण आणि ४ ते ५ किलो वाळलेली वैरण प्रति दिन देण्यात यावी. |
| **कुकुटपालन** | **-** | • ब्रॉयलर पक्षांना पहिले तीन आठवडे पक्षाच्या वजनानुसार ब्रॉयलर स्टार्टर व पुढील चार- सहा आठवड्यांपर्यंत ब्रॉयलर फिनिशर खाद्य द्यावे. तसेच ब्रॉयलर कोंबडीच्या मासातील कोलेस्टेरॉलचे प्रमाण कमी करण्यासाठी व अधिक वाढीसाठी खाद्याच्या १.५ टक्के काळे जिरे पावडर किंवा ०.५ टक्के हळद किंवा १ टक्का आले भुकटी देण्यात यावी.<br>• तापमानात वाढ संभवत असल्याने कुकुटपालन शेड मध्ये पाण्याची भांडी वाढवावी व पिण्यासाठी स्वच्छ आणि थंड पाण्याची मुबलक प्रमाणात देण्यात यावे. तसेच खाद्य सकाळी किंवा संध्याकाळच्या वेळेस देण्यात यावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**